# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, परभणी

# (महसूल विभाग)

email ID – rdc.parbhani@maharashtra.gov.in Ph. No.02452-223702

जा.क्र.2021/आरबी/डेस्क/पाटं/टॅंकर/निविदा क्र.1 दिनांक 24/03/2021

## खाजगी टॅंकर्ससाठी ई-निविदा सूचना (2020-21)

## (शुध्दीपत्रक तृतीय मागणी)

पिण्याच्या पाण्याच्या निवारणार्थ करावयाच्या उपाययोजने अंतर्गत जिल्हयातील गावे, वाड्या, तांडे आणि नगरपालिका क्षेत्रात टंचाईच्या तिव्रतेनुसार खाजगी टॅंकर्स/ट्रक्स (पाण्याची टाकी बसविलेले) भाड्याने घेण्याची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. त्यासाठी या कार्यालयाद्वारे ई-निविदा सूचना 2020-21 जा.क्र.2021/आरबी/डेस्क/पाटं/टॅंकर निविदा क्र.1, दिनांक 23/02/2021 अन्वये प्रसिध्द करुन दि.17/03/2021 रोजी पर्यंत टॅंकर्स/ट्रक्स (पाण्याची टाकी बसविलेले) द्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी अनुभवी व सक्षम कंत्राटदाराकडून ई-निविदा प्रणाली अंतर्गत www.mahatenders.gov.in वर निविदा मागविण्यात आली होती. परंतू ई-निविदा प्रणाली अंतर्गत तीन पेक्षा कमी निविदा धारकांनी भाग घेतल्याचे निदर्शणास आले. त्यामुळे निविदा दाखल करण्यासाठीची मुदत शुध्दीपत्रक द्वितीय मागणीद्वारे दिनांक 24/3/2021 रोजी पर्यंत वाढविण्यात आली होती. परंतू त्यानंतर देखील ई-निविदा प्रणाली अंतर्गत तीन पेक्षा कमी निविदा धारकांनी भाग घेतल्याचे निदर्शणास आले.

सबब, उक्त ई-निविदेतील सूचना आणि **"अटी व शर्ती"** कायम ठेऊन ई-निविदेस 7 दिवसांची मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यानुसार इच्छुक कंत्राटदारानी ई-निविदा प्रणाली अंतर्गत www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने सादर कराव्यात, त्याचा तपशिल खालील प्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| 1 | ई-निविदा विक्री/डाऊनलोड करण्याचा कालावधी | दि.1/4/2021 रोजी 17:00 वाजेपर्यंत |
| 2 | ई-निविदा ऑनलाईन भरण्याचा कालावधी | दि.1/4/2021 रोजी 17:00 वाजेपर्यंत |
| 3 | ई-निविदा (लिफाफा क्र.1) उघडण्याची संभाव्य दिनांक, वेळ व ठिकाण | दिनांक 6/4/2021 रोजी दुपारी 01:00 वाजता ठिकाण - जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी |

ज्या निविदाधारकाने पुर्वी निविदा भरलेली असेल, त्यांना पुन्हा निविदा भरण्याची आवश्यकता नसुन त्याने भरलेले दर सुधारण्याची मुभा राहील. सदरील ई-निविदा, निविदाधारक किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष ऑनलाईन पध्दतीने उघडण्यात येतील. तसेच ई-निविदा (लिफाफा क्र.2) उघडण्याची तारीख सोईनुसार संकेतस्थळाद्वारे कळविण्यात येईल.

ई-निविदेसंबंधी उपरोक्त तारखांमध्ये फेरबदल झाल्यास त्याची सुचना http://parbhani.nic.in व www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येईल, व्यक्तिगत सुचना देण्यात येणार नाही.

(दि.म.मुगळीकर भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी, परभणी